"Ease of doing business" च्या अनुषंगाने न्यायालयात जमा करावयाच्या दंडाच्या रकमा व इतर रकमा स्वीकृत करण्यासाठी जिल्हा सत्र न्यायालय, पुणे यांना स्टेट बँक ऑफ इंडिया मध्ये नवीन Targeted bank account उघडण्यास परवानगी देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२६/का.७
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १८ एप्रिल, २०१८.

वाचा :- केंद्रीय प्रकल्प समन्वयक, ई-कोर्ट प्रकल्प, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई यांचे पत्र क्र. Spl.Comp./२१५/२०१८, दिनांक २२.०३.२०१८.

प्रस्तावना :-

मा. सर्वोच्च न्यायालय यांच्या ई-समितीने दंडाच्या रकमा व इतर रकमा स्वीकृत करण्यासाठी ई-पेमेंटचा वापर करण्याचे निश्चित केले आहे. महाराष्ट्र राज्यातील दिवाणी व फौजदारी न्यायालयात जमा करावयाच्या रकमा शासनाच्या एकत्रित निधी किंवा PLA (personal ledger accounts) मध्ये जमा केल्या जातात. न्यायालयात जमा करावयाच्या रकमा (Judicial Deposit) शासनाच्या Government receipt Accounting System (GRAS) प्रणालीद्वारे भरता येत नाहीत. उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई यांना "Ease of doing business" च्या अनुषंगाने न्यायालयात जमा करावयाच्या दंडाच्या रकमा व इतर रकमा स्वीकृत करण्यासाठी प्रायोगिक तत्वावर जिल्हा सत्र न्यायालय, पुणे यांना स्टेट बँक ऑफ इंडिया मध्ये नवीन Targeted bank account उघडण्यास परवानगी देण्याबाबत प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावानुसार जिल्हा सत्र न्यायालय, पुणे या कार्यालयास न्यायालयात जमा करावयाच्या दंडाच्या रकमा व इतर रकमा स्वीकृत करण्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडिया मध्ये नवीन Targeted bank account उघडण्यास परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

जिल्हा सत्र न्यायालय, पुणे या कार्यालयास न्यायालयात जमा करावयाच्या दंडाच्या रकमा व इतर रकमा ई-पेमेंटचा वापर करुन स्वीकृत करण्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडिया मध्ये नवीन Targeted bank account प्रायोगिक तत्वावर उघडण्यास परवानगी देण्यासाठी संचालक, लेखा व कोषागारे, वित्त विभाग, मंत्रालय तसेच महालेखापाल, मुंबई यांनी दिलेल्या सहमतीनुसार खालील अटीं व शर्तींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे:-

१) लेखाशिर्षनिहाय व अदातानिहाय बँक स्क्रोल कोषागारास सादर करण्यात यावा.

२) न्यायालयाला प्रथमत: त्यांच्याकडे जमा झालेल्या रकमांची यादी व SBI मध्ये प्रत्यक्षात या यादीतील जमा झालेल्या रकमांचा ताळमेळ घ्यावा लागेल व त्यानंतर कोषागाराशी याच रकमांचा ताळमेळ घ्यावा लागेल. न्यायालयांच्या PLA मध्ये अंतिम नोंदी घेताना कोषागाराच्या लेख्यात समाविष्ट करण्यात आलेल्या रकमांचा अंतर्भाव करावा. SBI कडे अयशस्वी व्यवहारांच्या (Unsuccessful Transaction) ज्या रकमा जमा झालेल्या असतील त्या रकमांचा अंतर्भाव कोषागाराच्या लेख्यात नसेल.

३) महाराष्ट्र कोषागार नियम १९६८ मधील नियम क्रमांक ५१२ मधील अटी व शर्तीचे पालन करण्यात यावे.

४) कोषागार कार्यालयाकडून महालेखापाल कार्यालयास सादर करण्यात येणाऱ्या मासिक खाते अहवालाच्या पध्दतीत कोणताही बदल होणार नाही.

५) शासनाच्या जमा होणाऱ्या रकमा एकत्रित निधीत/स्वीय प्रपंची लेख्यामध्ये तात्काळ जमा होतील याची दक्षता घेण्यात यावी.

हा शासन निर्णय महालेखापाल कार्यालयाचे पत्र क्रमांक TM/CH2/2017-2018/71, दिनांक १७.०४.२०१८ अन्वये दिलेल्या अभिप्रायानुसार व सहमतीनुसार तसेच वित्त विभाग कोषा प्रशा-५ या कार्यासनाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक २३२/१८/कोप्र-५, दिनांक १७.०४.२०१८ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०४२११११३९३३७६१२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Amogh Shyamkant Kaloti

Digitally signed by Amogh Shyamkant Kaloti
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law and Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1f733daf00a6028414c43d0cc10d82acab3b732c4edd56e818f8a3b355588753, serialNumber=9ebeebf21dc54ceec51e6d5ffc84bb94ca6af89497279007d66e97dc13547037, cn=Amogh Shyamkant Kaloti
Date: 2018.04.21 11:42:46 +05'30'

(अ. श्या. कलोती)
विधि सल्लागार-नि-सह सचिव.

प्रति,

१) प्रबंधक मा. उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१/२,मुंबई/नागपूर,
३) महालेखापाल (लेखा परीक्षा)-१/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर ,
४) केंद्रीय प्रकल्प समन्वयक, ई-कोर्ट प्रकल्प, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई.
५) वित्त विभाग (व्यय-५, कोषाप्रशा--५)
६) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
७) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
८) कार्यासन अधिकारी/कार्यासन २३ व २४ विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई,
९) निवड नस्ती/का.७.